ARTHA (Commercial Weekly) Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २५ | पुणें, बुधवार तारीख १६ सप्टेंबर, १९५९ | अंक ३७

## विविध माहिती

**गरिबांना कायद्याची मदत**—गरिबांना कायद्याची मदत देणारी एक योजना मध्यवर्ती सरकारनें तयार केली असून ती राज्य सरकारांचीं मतें अजमावण्यासाठी पाठविण्यांत आली आहे. केवळ पैसा नाहीं म्हणून न्याय मिळण्यास अडचण पडूं नये आणि न्याय महाग होऊं नये म्हणून ही योजना तयार करण्यांत आली आहे.

**जर्मन बोलपटांची आयात**—जर्मन चित्रपटांच्या निर्यात संघानें जर्मन बोलपट भारतांत आयात करण्याविषयीं प्रयत्न चालविले आहेत. जर्मनी दरसाल ४०० परदेशी बोलपट आयात करतो. त्यांत कांहीं भारताचे चित्रपटहि असतात. चित्रपटांच्या आयातीवरचे सध्यांचे निर्बंध रद्द केले तर उभय देशांचे अधिकाधिक बोलपट एकमेकांच्या देशांत दाखवितां येतील.

**मुंबईत फिरतीं कोर्टें**—मुंबईच्या रस्त्यांवरून बेफिकीरपणें चालणाऱ्या पादचाऱ्यांना व गैरवाजवी रीतीनें मोटार हाकणाऱ्यांना जरब बसावी म्हणून मुंबई सरकार फिरतीं कोर्टें निर्माण करण्याचा विचार करीत आहे. कलकत्ता शहरांत अशीं कोर्टें आहेत. मुंबईत त्यांची स्थापना झाली, तर ह्या बाबतींतील तें दुसरें शहर होईल. कलकत्त्यांत १२ मॅजिस्ट्रेट रस्त्याच्या कडेलाच वाहतुकीबाबतच्या गुन्ह्यांचें काम चालवितात.

**प्राध्यापकांना पगारवाढ**—विद्यापीठ अनुदान समितीनें मदत दिल्यामुळें पंजाबमधील ४० कॉलेजांच्या प्राध्यापकांना नवीन पगाराची श्रेणी लागू करण्यांत येणार आहे. नव्या वेतन-श्रेणीमुळें खर्चांत जी वाढ होईल त्यापैकीं ५० टक्के खर्च विद्यापीठ, सरकार अगर कॉलेजें सोसतील. स्त्रियांच्या कॉलेजांना येणाऱ्या जादा खर्चापैकीं २५ टक्के खर्च वरील प्रमाणें सोसला जाईल.

**साखर कामगारांना बोनस**—उत्तर प्रदेश सरकारनें राज्यांतील २४ साखर-कारखान्यांनीं आपल्या कामगारांना १९५७–५८ सालच्या बोनसप्रीत्यर्थ १०,६४,२५० रुपयांची रक्कम द्यावी असा हुकूम काढला आहे. ह्या व इतर कांहीं कारखान्यांनीं बोनस देण्याबाबत सूट मिळविण्याचे प्रयत्न चालविले होते. पण, ह्याबाबत नेमलेल्या कमिटीनें दिलेल्या निर्णयानुसारच सरकारनें वरील हुकूम काढला आहे.

**सुरत म्युनिसिपालिटीला कर्ज**—सुरत शहरांतील सांडपाण्याचीं गटारें झांकून टाकण्यासाठी मुंबई सरकारनें म्युनिसिपालिटीला २लाख रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. कर्जावर ५ टक्के व्याज घेण्यांत येणार असून तें १२ वर्षांत फेडावयाचें आहे. म्युनिसिपालिटीनें आणखी कांहीं कामासाठी सरकारकडे कर्जाची मागणी केली आहे.

**लडाखमध्यें नवीन रस्ते**—लडाखमधील डोंगराळ भागांत रस्ते बांधण्यासाठी काश्मीर सरकारनें १० लाख रुपये मंजूर केले आहेत. एकूण २० मैल लांबीचे रस्ते तयार करण्यांत येतील. त्यापैकीं ६ मैल रस्ता अगदीं नवा आहे व १४ मैल रस्त्याची सुधारणा करण्यांत येणार आहे.

**जबलपूरमधील साखरेचें वांटप**—जबलपूर शहरांतील साखरेच्या विक्रीची व्यवस्था मध्यप्रदेश सहकारी मार्केटिंग सोसायटीकडे देण्यांत आली आहे. सोसायटीनें साखरेचें वांटप करण्यासाठी १३ दुकानें उघडलीं असून आणखीहि लवकरच उघडण्यांत येतील. पूर्वी हें काम निवडक दुकानदारांकडे सोंपविण्यांत आलें होतें. पण त्यांचे व्यवहार समाधानकारक न आढळल्यामुळें नवीन व्यवस्था करण्यांत आली आहे.

**हरवलेला दुवा सांपडला**—मनुष्याच्या उत्क्रांतीच्या, डारविननें सांगितलेल्या साखळींतील एक दुवा अद्यापर्यंत सांपडलेला नव्हता. नैरोबी येथील एका पुराण वस्तुसंग्रहालयाच्या व्यवस्थापकाला हा दुवा सांपडल्याची वार्ता आहे. हा दुवा म्हणजे सुमारें ६,००,००० वर्षांपूर्वीची एक कवटी असून ती दगडाचीं हत्यारें बनविणाऱ्या मानववंशाची सर्वांत जुनी निशाणी आहे.

**भिकाऱ्यांना नऊ लाखांची भिक्षा**—दिल्लीमधील भिकाऱ्यांच्या प्रश्नाचा अभ्यास करणाऱ्या एका संस्थेनें अशी माहिती जमविली आहे, कीं दिल्लीमधील ३,००० भिकाऱ्यांना दरसाल ९ लाख रुपये भिक्षा म्हणून मिळतात. हें दातृत्त्व व्यक्तीगत असण्याऐवजीं संघटित करण्यांत आलें तर भिकाऱ्यांचा अधिक फायदा होईल असा निष्कर्ष काढण्यांत आला आहे.

**शहरांतील घरांचा प्रश्न**—शहरांतील रहात्या घरांच्या प्रश्नाची चर्चा करण्यासाठी मुंबई येथें एक परिसंवाद भरविण्यांत आला होता. परिसंवादाचें उद्घाटन करतांना मुंबई राज्याचे गव्हर्नर श्री. श्रीप्रकाश म्हणाले कीं, शहरांतील घरें बांधतांना त्यांच्या उपयक्ततेबरोबरच काटकसरीच्या बांधणीकडेहि लक्ष देण्यांत आलें पाहिजे. घरें लोकांच्या आर्थिक कुवतीच्या आवाक्यांत असलीं पाहिजेत.

**अबूच्या विकासाची योजना**—राजस्थानांतील अबू ह्या निसर्गरम्य गिरिनिवासाच्या विकासाची योजना आंखण्यांत आली आहे. योजनेसाठी ३,७६,००० रुपये खर्च येईल व ती १९६० सालपर्यंत पुरी होईल. तेथें एक नवी बाग तयार करण्यांत येईल. त्याचप्रमाणें तळ्यांत फिरण्यासाठी दोन मोटारबोटी ठेवण्यांत येतील. शिवाय पोलो ग्राउंडवर एक स्टेडिअम बांधण्यांत येईल.

## जालना मार्केट कमिटीच्या नियमानुसार खरेदी-विक्रीची व्यवस्था

### व्यापाऱ्यांचें सहकार्य

दिनांक ५-९-५९ रोजीं मार्केट कमिटी, जालना यांचे कार्यालयांत श्री. चंद्रकांतराव खर्डेकर, चेअरमन, मार्केट कमिटी, जालना यांचे अध्यक्षतेखालीं व्यापारी बंधूंची बैठक भरली होती. व्यापारी बंधूंनीं त्यांचा दैनंदिन खरेदी-विक्रीचा व्यवहार मार्केट कमिटीच्या नियमानुसार करावा व नियमांची अंमलबजावणी करण्यासंबंधीं व्यापारी बंधूंनीं सर्व दृष्टीनें सहकार्य करण्याबद्दलची विनंती श्री. चंद्रकांतराव यांनीं प्रास्ताविक भाषणांत केली. व्यापाऱ्यांना ज्या कांहीं व्यावहारिक अडचणी येतील त्या मित्रत्वाच्या व सहकार्याच्या मार्गानें नियमांचें पालन करून सोडवितां येतील असेंहि त्यांनीं सांगितलें. व्यापारी बंधूंनीं खेळीमेळीच्या वातावरणांत आपल्या प्रत्यक्ष अडीअडचणींचा विचारविनिमय केला. सोमवार दिनांक ७-९-१९५९ पासून माल खरेदी-विक्रीची व्यवस्था खालीलप्रमाणें करण्याचें ठरलें व व्यापारी बंधूंनीं सहकार्य करण्याचें आश्वासन दिलें.

(१) झेंडी नेहमींप्रमाणें सकाळीं ठीक ९ वाजतां निघेल.

(२) प्रत्येक व्यापाऱ्यांच्या दुकानावर झेंडी उभी केली जाईल व त्या ठिकाणीं विक्रीकरतां ठेवलेल्या सर्व मालाचा लिलांव करण्यांत येईल. झेंडीच्या वेळेस लिलांव झालेल्या मालाची संपूर्ण नोंद मार्केट कमिटीचे नोकर रजिस्टरमध्यें घेतील व त्यावर माल खरेदी घेणार व विक्री करणार यांच्या सह्या घेण्यांत येतील.

(३) लिलांवांत माल विकत घेणाऱ्यांनीं संपूर्णपणें माल पाहूनच व चौकशी करूनच भाव ठरवावा.

(४) माल विकत घेणाऱ्यांनीं मार्केट यार्डमध्यें बीड संपतांच तावडतोब मोजणीस आरंभ करावा.

(५) बीडनंतर आलेला माल बीड संपेपर्यंतच्या वेळांतच व्यापाऱ्यांना विकण्यास मुभा आहे व त्याबद्दलची नोंद त्यांनीं मार्केट कमिटीस द्यावी.

या सभेंत श्री. मदनलालजी चोविशिआ, कचरूलालजी भक्कड, कचरूलालजी आवड, कुंदनलालजी पंजाबी, बद्रीनारायणजी बारवाले, घनःश्यामदेव शर्मा, मुरमल फुलचंद, जयंतीलाल प्रभूलाल, दयाराम रधाकिसन, रामलाल हुकुमचंद, जयचंदलाल किशोरीलाल कलकत्तेवाला, चंदुलालजी कांतिलाल व इतर बऱ्याचशा व्यापाऱ्यांनीं आपापल्या परीनें बिडिंग सिस्टिमसंबंधीं विचार मांडले.

---

**दि मुरगूड सहकारी बँक लि., मुरगूड**
**प्रेसिडेंट : विश्वनाथराव हरिभाऊ पाटील**
**मॅनेजर : एच. बी. पाटील**

शेअर भांडवल १,१५,७२५ रु., फंड्स ७६,२५७ रु., ठेवी २,८४,०४२ रु., इनव्हेस्टमेंट्स ५५,६२२ रु., कर्जे ३,८४,८७१ रु., असे ह्या बँकेच्या ताळेबंदाचे प्रमुख आंकडे आहेत. बँकेचा १२,२८९ रु. व दुकानचा ८,४०० रु. असा एकूण २०,६७९ रु. नफा झाला. ६¼% डिव्हिडंडला ७,२०० रु. लागतील. दिलेल्या कर्जाशीं थकबाकीचें प्रमाण ११·२८% पडतें; थकबाकी कमी करण्यांत बोर्ड यशस्वी झालें आहे.

### आकाशवाणीवर ' पडसाद '

श्री. श्री. वा. काळे ह्यांच्या 'पडसाद' मालिकेंतील पांचवी श्रुतिका बुधवार, दि. १६ सप्टेंबर रोजीं पुणें नभोवाणीवरून 'गृहिणी' मध्यें ध्वनिक्षेपित होईल.

### बँकांची देखरेख व नियंत्रण

रिझर्व्ह बँकेनें ३० जून, १९५९ असेर संपलेल्या वर्षी ६६ शेड्यूल्ड व २५१ बिगर शेड्यूल्ड बँकांची तपासणी केली; त्यापूर्वीच्या वर्षी अनुक्रमें ४६ शेड्यूल्ड व १२२ बिगर शेड्यूल्ड बँका तपासण्यांत आल्या होत्या. ह्या तपासणीपैकी फक्त दोन सोडून बाकी सर्व तपासण्या बँकिंग कंपन्यांच्या कायद्याच्या ३५ व्या कलमाखालीं होत्या. तपासणीच्या रिपोर्टबाबत संबंधित बँकांचें म्हणणें मागविण्यांत आलें व तें विचारांत घेऊन दाखविलेले दोष नाहींसे करण्याच्या प्रगतीच्या मासिक रिपोर्टाची १७१ बँकांकडून मागणी करण्यांत आली. १४४ बँकांना प्रगतीचे त्रैमासिक रिपोर्ट पाठविण्यास सांगण्यांत आले आहे. जरूर त्या वेळीं संबंधित बँकांच्या प्रतिनिधींना समक्ष बोलावून महत्त्वाचे दोष दूर करण्याची तांतडी त्यांना पटवून देण्यांत आली. कांहीं बँकांच्या बाबतींत ह्याहिपेक्षा अधिक नियंत्रणाची आवश्यकता वाटली; त्यांचेवर योग्य त्या जादा अटी किंवा बंधनें घालावीं लागलीं. जून, १९५९ असेर अशा अटी किंवा बंधनांखालीं चालू असलेल्या ४४ बँका (१८ शेड्यूल्ड व २६ बिगर शेड्यूल्ड बँका) होत्या.

---

### ६२ बँकांना लायसेन्स

३० जून, १९५८ असेर ५७ बँकांना लायसेन्स दिलेला होता; ३० जून, १९५९ असेर त्यांची संख्या ६२ झाली. ह्या ६२ बँकांच्या, स्टेट बँकेच्या व ५ स्टेट असोसिएटेड बँकांच्या मिळून ठेवी सर्व बँकांच्या एकूण ठेवींच्या ९४% होत्या. म्हणजे, फक्त ६% ठेवी लायसेन्स नसलेल्या बँकांकडे आहेत. अहवालांचे वर्षी १२ बँकांना लायसेन्स नाकारण्यांत आला; म्हणजे आतांपर्यंत १२९ बँकांना लायसेन्स नाकारण्यांत आला आहे.

---

**गोध्रा येथें नवें कॉलेज**—गोध्रा येथील पंचमहाल शिक्षण प्रसारक मंडळ ह्या संस्थेला श्री. पुरुषोत्तमदास टाकूरदास ह्यांनीं २,५०,००० रुपयांची देणगी दिली आहे. ह्या देणगीचा उपयोग करून संस्थेतर्फे गोध्रा येथें एक आर्ट्स व सायन्स कॉलेज सुरू करण्यांत येणार आहे. पुढील शैक्षणिक वर्षापासून कॉलेजच्या वर्गांना प्रारंभ करण्यांत येईल.

**मिशनऱ्यांच्या इस्पितळांना मदत**—मुंबई राज्यांत ६५ इस्पितळें आहेत. त्यांपैकी ३५ इस्पितळें परदेशांतील मिशनऱ्यांनीं चालविलेलीं आहेत, १४ हिंदी मिशनऱ्यांनीं चालविलेलीं आहेत. आणि १५ उभयतांच्या संयुक्त कारभाराखालीं आहेत. मिशनऱ्यांनीं चालविलेल्या बहुतेक इस्पितळांना सरकारी मदत देण्यांत येत असते.

**गुदामावरील अधिकाऱ्यांना शिक्षण**—मध्यवर्ती सरकारतर्फे व राज्य-सरकारतर्फे शेतीच्या मालाची साठवण चांगल्या प्रकारें व्हावी म्हणून गुदामें बांधण्यांत आलीं आहेत. ह्या गुदामांवर काम करणाऱ्यांना शिक्षण देण्यासाठीं एक केंद्र नागपूर येथें खोलण्यांत आलें आहे. १९५८ सालीं नागपूरच्या केंद्रानें १३८ लोकांना शिक्षण दिलें.

**जप्त पुस्तकाचें प्रकाशन**—भारत सरकाच्या शिक्षणखात्यानें ' भारत मे अंग्रेजी राज ' ह्या नांवाचें इतिहासावरील पुस्तक पुन्हा प्रकाशित केलें आहे. ब्रिटिश राजवटींत तें जप्त करण्यांत आलें होतें. सदर ग्रंथ १९२० सालीं पंडित सुंदरलाल ह्यांनीं लिहिलेला आहे. आतां ह्या ग्रंथाची नवीन आवृत्ति तीन खंडांत काढण्यांत आली आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १६ सप्टेंबर, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## आणखी कमिटी कशाला हवी ?

### "हिंदु" चा अभिप्राय

श्री. वैकुंठराय मेहता ह्यांच्या अध्यक्षतेखाली भारत सरकारनें शेतकी पतपुरवठ्याच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं एक कमिटी नेमली आहे, तिचें प्रयोजन काय? असा प्रश्न मद्रासच्या 'हिंदु' नें सरळ विचारला आहे. त्या पत्राच्या मतें, जे प्रश्न ही नवी कमिटी अभ्यासणार आहे, त्या सर्व प्रश्नांचा सांगोपांग विचार ह्यापूर्वी झालेलाच आहे. रिझर्व्ह बँकेनें नेमलेल्या गोरवाला कमिटीचा रिपोर्ट अजून ताजा आहे. शेतकी पतपुरवठ्याचे आणि सहकारी पतपेढ्यांच्या कार्यक्षेत्राचे आतां आणखी काय नवे प्रश्न निर्माण झाले आहेत, कीं तें सोडवायला तज्ज्ञांची नवी कमिटी हवी ?

"सहकारी संस्थांना बाहेरील मदतीच्या आधारानें उभ्या ठेवण्याचें सरकारी धोरण आहे; समान हितसंबंधांच्या लोकांनीं एकत्र येऊन सहकार्यानें आपले प्रश्न सोडविण्यास त्यामुळें प्रोत्साहन उरत नाहीं. स्वतःच्या बचतींतून भांडवल निर्माण करण्यांत पतपेढ्यांना यश न आल्यामुळें इतर सहकारी संस्थांनीं, रिझर्व्ह बँकेनें व सरकारनें पुरविलेले पैसे वांटणाऱ्या सावकारी दुकानदारींत त्यांचें रूपांतर झालें आहे. रिझर्व्ह बँकेनें अल्प व्याजानें पैसे दिले, तरी पतपेढ्या ज्या दरानें अखेर कर्ज देतात, ते दर त्यामानानें उतरलेले नाहींत. पतपेढ्यांची कर्जउभारणीची मर्यादा वाढविण्यासाठीं किंवा सरकारनें पतपेढ्यांच्या शेअर भांडवलांत भागदार होण्यासाठीं अखिल भारतीय कमिटीच्या स्थापनेची जरुरी नव्हती. सहकारी क्षेत्रांतील पुढाऱ्यांनींच ह्या प्रश्नांचा विचार करून मार्गदर्शन करायला हवें. जोंपर्यंत सहकारी चळवळीचें धोरण ठरविण्याचें काम अधिकारी वर्गाकडे सोंपविलेलें आहे, तोंपर्यंत सहकारी चळवळीला स्वावलंबन प्राप्त होण्याची शक्यता नाहीं. सहकारी प्रश्नांच्या विचाराला खालच्या थरांतून चालना मिळायला हवी; त्यायोगेंच चळवळीस जोम लागेल, शक्ति प्राप्त होईल आणि स्वतंत्रपणा मिळेल."

### हिंदी तंत्रज्ञाच्या करामतीमुळें फायदा

भारतामधील रेल्वेमार्गासाठीं अजूनहि पुष्कळशी सामग्री परदेशांतून आयात करावी लागते आणि तीसाठीं लाखों रुपयांचें परदेशीय चलन द्यावें लागतें. उत्तर रेल्वेवरील के. एल. बॅनर्जी ह्या नांवाच्या एका फोरमननें केलेल्या प्रयोगामुळें कांहीं विशिष्ट प्रकारचीं डब्यांना लागणारीं चाकें आतां भारतांत होऊं लागलीं आहेत. भारतांत सिमला—कालका रेल्वेसारखे कांहीं रेल्वेमार्ग अगदीं अरुंद रुळाचे आहेत. अशा मार्गावर चढहि बराच असला व वळणें जवळचीं असलीं तर सामान्य प्रकारचीं डब्यांचीं चाकें चालत नाहींत. विशेष पाणी दिलेलीं अशीं कठीण चाकें मुद्दाम तयार करावीं लागतात. अशा प्रकारचीं ३०० चाकें रेल्वेला दरवर्षी लागत असत व तीं अर्थातच परदेशांतून मागवावीं लागत असत. प्रत्येक चाकासाठीं १२० रुपये द्यावे लागत असत. डोंगराळ मार्गांत चालणाऱ्या अशा रेल्वेमार्गावर चाकांची झीज फार होते. मुद्दाम तयार केलेलीं चाकें वापरलीं तरच तीं टिकूं शकतात. दोन वर्षांपूर्वी परदेशी चलनाची अडचण फार भासूं लागली तेव्हां रेल्वे-अधिकाऱ्यांनीं आपल्या कारखान्यांतून जरूर तीं चाकें तयार करण्याच्या शक्यतेचा अंदाज घेण्यास सुरुवात केली. श्री. बॅनर्जी हे कालका येथील रेल्वेच्या कारखान्यांत फोरमन म्हणून काम करीत आहेत. त्यांनीं ह्या बाबतींत प्रयोग करून चाकें बनविण्याच्या कामीं यश मिळविलें. त्यांनीं बनविलेलीं चाकें परदेशी चाकांच्याबरोबरच डब्यांना लावण्यांत येऊन सिमला—कालका मार्गावर त्यांची महिनाभर चांचणी घेण्यांत आली. कालका येथील कारखान्यांत बनविलेलीं चाकें परदेशांतून आणलेल्या चाकांच्या बरोबरीचीं ठरलीं. त्यामुळें आतां अशीं चाकें कालका येथील कारखान्यांतच बनविण्यांत येऊं लागलीं आहेत.

### लोकसंख्येची वाढ व कुटुंबनियोजनाचा प्रश्न

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीपर्यंत भारताची लोकसंख्या ४८ कोटींच्या घरांत पोचेल असा अंदाज कांहीं तज्ज्ञांनीं नुकताच केला आहे. त्यावरून कुटुंबनियोजनाचा प्रचार व प्रसार करण्याची जरूरी पुन्हा एकदां स्पष्टपणें कळून येण्यासारखी आहे. अगदीं अलीकडील काळापर्यंत कुटुंबनियोजनाच्या आरोग्यविषयक बाजूवरच भर देण्यांत येत असे. कुटुंबनियोजनाच्या तंत्राचा मोठ्या प्रमाणावर प्रसार करण्याचें महत्त्व त्या मानानें मागें पडलें होतें. कुटुंबनियोजनाचें मुख्य ध्येय जननाचें प्रमाण कमी करून राष्ट्राच्या साधनसंपत्तीला झेपेल इतकीच लोकसंख्या स्थिर करण्याचें आहे. पण दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमापर्यंत हें ध्येय स्पष्ट करण्यांत आलेलें नव्हतें. कुटुंबनियोजनाच्या ह्या बाजूकडे आतां विशेष लक्ष देण्याची वेळ आलेली आहे. कुटुंबनियोजन बोर्डाच्या नुकत्याच भरलेल्या बैठकींत जी चर्चा झाली, तीवरून वरील ध्येयाची सरकारला जाणीव झाल्याचें दिसून येतें. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाचा जो कच्चा आराखडा तयार करण्यांत आलेला आहे त्यांत कुटुंबनियोजनासाठीं ७३ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आल्याचें समजतें. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत कुटुंबनियोजनाच्या प्रचारासाठीं व प्रसारासाठीं ५० कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली होती. देशांतील ३६,००० वैद्यकीय व आरोग्यविषयक संस्थांमध्यें कुटुंबनियोजनाविषयीं सल्ला व मदत देण्याचीहि व्यवस्था करण्यांत येणार आहे. तरीसुद्धां स्वतंत्रपणें सल्ला देणाऱ्या कुटुंबनियोजन केंद्रांची आवश्यकता संपलेली नाहीं. कारण, अजून ह्याविषयाचें महत्त्व लोकांना पटावें तितकें पटलेलें नाहीं.

### बँकांनीं ठेवीवरील व्याजाचे दर उतरविले

दिनांक १ सप्टेंबरपासून बँकांनीं ठेवीवरील व्याजाचे दर उतरविले, त्याची माहिती वरील शीर्षकाखाली, "अर्थ" च्या दि. ९ सप्टेंबरच्या अंकांत आली होती. त्यांत सात दिवस ते तीन महिने मुदतीला ३३/४% व्याज मिळेल, असें म्हटलें होतें, त्याऐवजीं ३१/२% व्याज मिळेल असें पाहिजे. ही चूक आमच्या निदर्शनास आणल्याबद्दल आम्ही इंडियन बँक्स असोसिएशनचे आभारी आहों.

## नियोजन मंडळानें घेतलेला आढावा

### योजनेसाठी उपलब्ध साधनसामग्री व खर्च

नियोजन मंडळानें संसदेला 'प्लॅन रिसोर्सिस अॅण्ड आउटले, ए रिव्ह्यू' या नांवाचा एक अहवाल सादर केला. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचीं मूलभूत उद्दिष्टें साध्य करण्यासाठी जोरदार प्रयत्न झाले पाहिजेत यावर सदर अहवालांत भर देण्यांत आला आहे. या अहवालांत प्रामुख्यानें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचाच विचार करण्यांत आला असला तरी, मध्यवर्ती तसेंच राज्य सरकारांनीं तिसरी पंचवार्षिक योजना आंखण्यास जोरानें सुरुवात केली आहे ही गोष्ट लक्षांत घेतां या अहवालांत पुनर्विलोकन करण्यांत आलेल्या प्रश्नांस व अनुभवांस भारताच्या नियोजित विकासाच्या पुढील अवस्थेसाठी अचूक दृष्टिकोन ठरविण्याच्या दृष्टीनें अधिक महत्त्व प्राप्त झालें आहे.

राष्ट्रीय विकास मंडळाच्या मे, १९५८ मध्यें झालेल्या बैठकींत दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील सरकारी क्षेत्राचे 'अ' व 'ब' असे दोन भाग करण्याचा निर्णय घेण्यांत आला होता 'अ' हा भाग एकूण ४,५०० कोटी रुपये खर्चाचा असून त्यांत शेतकीउत्पादनाशीं प्रत्यक्ष संबंध असलेल्या योजना व कार्यक्रम, योजनेच्या गाभ्यांत समाविष्ट केलेले कार्यक्रम, प्रगत अवस्थेंत गेलेले कार्यक्रम आणि टाळतां येणें शक्य नसलेले इतर कार्यक्रम यांचा समावेश करण्यांत आला. 'ब' भाग एकूण ३०० कोटी रुपये खर्चाचा असून जादा पैसा उपलब्ध होण्यावर त्या विभागांतील कार्यक्रम हातीं घ्यावयाचे असें ठरलें होतें. त्याचप्रमाणें मध्यवर्ती आणि राज्य सरकारांनीं ज़ादा कर, अल्प बचती, योजना खर्चांत काटकसर, इत्यादि मार्गांनीं आपली साधनसामग्री जास्तींत जास्त वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत यावरहि या बैठकींत भर देण्यांत आला होता.

संसदेंत नोव्हेंबर, १९५८ मध्यें झालेल्या चर्चेतहि, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील उद्दिष्टें साध्य करून घेण्यासाठी योजावयाच्या उपायांवर लक्ष केन्द्रीभूत करण्यांत आलें होतें. या चर्चेत मोठमोठ्या योजनांवरील खर्चाचे अंदाज काळजीपूर्वक तयार करणें, बांधकामांतील खर्चांत काटकसर करण्याची व अपव्यय टाळण्याची आवश्यकता, किंमतीमान स्थिर राहण्यास असलेलें महत्त्व व फाजील प्रमाणांतील तुटीचा अर्थसंकल्प टाळणें, शेतकी उत्पादनास अग्रहक्क, उद्योगविनिमयविषयक धोरणांचा फेरविचार व तिसरी पंचवार्षिक योजना आंखण्याचें काम लवकर हातीं घेण्याची इष्टता, या मुद्यांचा विचार झाला होता.

नियोजन मंडळानें राष्ट्रीय विकास मंडळाच्या नोव्हेंबर, १९५८ च्या बैठकीसाठी, योजनेवरील खर्च व आर्थिक साधनें यासंबंधीं तयार केलेल्या अहवालांत या योजनेच्या काळांत एकूण फक्त ४,२२० कोटी रुपये खर्च होईल असें मत व्यक्त केलें होतें. तथापि मंडळानें आपल्या बैठकींत ४,५०० कोटी रुपये खर्चाच्या योजनेसाठी प्रयत्न करण्याचें ठरविलें आणि हें लक्ष्य गांठण्यासाठी अनेक उपाय योजण्याचा निर्णय घेतला. अन्नधान्यांच्या उत्पादनांत मोठ्या प्रमाणावर वाढ होऊन त्याचबरोबर अन्नधान्यांच्या किंमतींची पातळी स्थिर राखतां आली तरच मोठ्या प्रमाणावर तुटीच्या अर्थसंकल्पाचा विचार करतां येईल असें मंडळाचें मत होतें आणि म्हणून खेडें हा मूलभूत घटक धरून आणि त्याचबरोबर स्थानिक मनुष्यबळ व इतर साधनांची उभारणी करून सर्वसाधारणत: ग्रामीण अर्थव्यवस्थेची पुनर्उभारणी करण्यासाठी सहकारी संस्था स्थापण्याचें ठरलें. त्याचप्रमाणें सरकारनें अन्नधान्यांचा घाऊक व्यापार आपल्या हातीं घ्यावा असेंहि ठरलें. बांधकामावरील खर्चांत काटकसर करण्यासाठी पूर्वी ठरल्यापेक्षा कमी इमारती बांधाव्यात आणि बांधाव्या लागणाऱ्या इमारती कमी खर्चांत उभाराव्यात असें ठरलें. पोलादाची बचत करण्याच्या प्रश्नास खास महत्त्व असल्यानें कोणत्या कारणास्तव पोलादाचा वापर करणार तें नमूद करण्यांत यावें असा निर्णय घेण्यांत आला. त्याचप्रमाणें सक्तीच्या बचतीच्या योजना सुरू करण्याच्या प्रश्नाचीहि काळजीपूर्वक तपासणी करावी अशी शिफारस केली होती.

नियोजन मंडळानें डिसेंबर, १९५८ व जानेवारी, १९५९ मध्यें राज्य सरकारांशीं १९५९–६० मध्यें राज्यांच्या योजनांवर करावयाचा खर्च ठरविण्यासाठी अनेक वेळां वाटाघाटी केल्या. खर्चाचें वांटप ठरवितांना दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील एकूण खर्च ४,५०० कोटी रुपयांपेक्षा कमी होणार नाहीं हा निर्णय मंडळानें आपल्या दृष्टीपुढें ठेवला होता. राज्य सरकारांस १९५९–६० मध्यें पूर्वी अंदाजिलेल्या १९८·१ कोटी रुपयांऐवजीं खर्च करण्यासाठी एकूण २३७·३ कोटी रु. उपलब्ध होतील असें या चर्चेच्या वेळीं दिसून आलें. त्याच्या जोडीस मध्यवर्ती सरकारची मदत जमेस धरतां राज्य सरकारांच्या योजनांवर १९५९–६० सालीं एकूण ४७२ कोटी रुपये खर्च करण्याचें ठरलें. मध्यवर्ती सरकारच्या (केंद्रशासित प्रदेश धरून) १९५९–६० च्या अर्थसंकल्पांत दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी ६२० कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. म्हणजे अशा रीतीनें मध्यवर्ती व राज्य सरकारांचा १९५९–६० चा दुसऱ्या पंचवार्षिक योजनेवरील खर्च १०९२ कोटी रुपये होतो.

नियोजन मंडळानें स्थूलमानानें केलेल्या मूल्यमापनावरून या योजनेच्या पहिल्या चार वर्षांत प्रत्यक्षांत ३,५५० कोटी रुपये खर्च होण्याची शक्यता दिसून येते आणि राष्ट्रीय विकास मंडळानें संकल्पिल्याप्रमाणें योजनेच्या पांच वर्षांत हा आंकडा ४,५०० कोटी रुपयांपर्यंत जाईल अशी अपेक्षा आहे.

या अहवालांत उद्योगधंदे, वाहतूक, पाटबंधारे व वीज क्षेत्रासंबंधीं दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट केलेल्या योजनांची एक यादी दिली असून त्यावरील खर्च पहिल्या चार वर्षांत त्यामानानें कमी होण्याचा वा मुळींच न होण्याचा संभव आहे. स्थूलमानानें याच योजनांवर बारकाईनें देखरेख ठेवून परिणाम होण्यासारखा आहे. यांपैकी कांहीं योजना अजून सुरू झाल्या नसून त्या योजनेच्या अखेरच्या वर्षांत हातीं घ्याव्या लागतील.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## भारतांतील जनरल विमा-व्यवसाय

### १९५७ मधील प्रगति

भारतांतील जनरल विम्याचें काम करणाऱ्या विमा कंपन्यांस १९५७ मध्यें भारतांतील त्यांच्या व्यवसायापोटीं १०.९३ कोटी रु. निव्वळ उत्पन्न झालें. यापैकी फायर इन्शुरन्सपासून ३.७६ कोटी रु., मरीन इन्शुरन्सपासून २.०९ कोटी रु. व इतर प्रकारच्या विमा-व्यवसायापासून ५.०८ कोटी रु. उत्पन्न झालें. याच वर्षांत बिगर-भारतीय विमा कंपन्यांचें हप्त्यांचें निव्वळ उत्पन्न एकूण ७.१६ कोटी रु. होतें. यापैकी फायर, मरीन व इतर विमा-व्यवसाय यापासून अनुक्रमें ३.११ कोटी रुपये, १.९१ कोटी रुपये व २.१४ कोटी रुपये मिळाले. भारतीय विमा कंपन्यांना भारताबाहेरील त्यांच्या कामाच्या बाबतींत हप्त्यांचें निव्वळ उत्पन्न याच कालांत एकूण ११.५९ कोटी रुपये झालें. त्यापैकी फायर, मरीन व इतर प्रकारच्या विमाव्यवसायांतून अनुक्रमें ६.९३ कोटी रुपये, २.०५ कोटी रु. व २.६१ कोटी रु. मिळाले. भारत सरकारच्या कंट्रोलर ऑफ इन्शुरन्स यांनीं नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या "इंडियन इन्शुरन्स इयर बुक १९५८" या अहवालांत सदर आंकडेवारी देण्यांत आली आहे.

### विमा कंपन्यांची संख्या

सन १९३८ च्या इन्शुरन्स ॲक्टानुसार, ३१ डिसेंबर, १९५८ रोजीं भारतांत १८४ विमा कंपन्यांची नोंद होती; त्यांपैकी ९१ कंपन्या भारतीय तर ९३ परदेशी होत्या. यापैकी ४९ भारतीय व ३८ परदेशी कंपन्यांची उपरोक्त तिन्ही प्रकारच्या, १३ भारतीय व २० परदेशी कंपन्यांची यांपैकी दोन प्रकारच्या, आणि बाकीच्या २९ भारतीय व ३५ परदेशी कंपन्यांची केवळ एकाच प्रकारच्या विमा व्यवसायासाठीं नोंद करण्यांत आली होती. यांत आयुर्विमा व इतर प्रकारच्या विमा-व्यवसायासाठीं नोंदण्यांत आलेल्या लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचा समावेश होत नाहीं.

### मुंबईंतील विमा कंपन्या

भारतीय विमा कंपन्यांपैकी ५२ कंपन्यांची मुंबई राज्यांत नोंदणी होती व हप्त्यांपासून आलेल्या एकूण उत्पन्नांत त्यांचा हिस्सा ५९ टक्के होता. संकीर्ण विमा व्यवसाय करणाऱ्या ७ नॉन-टॅरिफ भारतीय विमा कंपन्यांचें हप्त्यांद्वारां मिळालेलें उत्पन्न, अशा एकूण उत्पन्नाच्या ८ टक्के होतें.

या वर्षांत भारतीय विमा कंपन्यांस एकूण २३.१३ कोटी रु. उत्पन्न झालें. यांत भारतांतील विम्याच्या हप्त्यांपासून १०.९३ कोटी रु., भारताबाहेरील विमा हप्त्यांपासून ११.५९ कोटी रु., व्याज, नफा व भाडीं यांपासून ०.३३ कोटी रु. व बाकीचें उत्पन्न संकीर्ण साधनांतून झालें. या कंपन्यांनीं सदर वर्षांत क्लेम्स, कमिशन, खर्च व संकीर्ण खर्च यांसाठी अनुक्रमें १०.६९, ३.३१, ६.१६ व ०.३१ कोटी रु. दिले. उरलेल्या २.६६ कोटी रुपयांपैकी १.६३ कोटी रुपये ज्या विम्यांच्या बाबतींत जोखमीची मुदत संपलेली नव्हती त्यांच्यासाठीं राखीव म्हणून ठेवण्यांत आले असून बाकीचे १.०३ कोटी रु. नफा-तोटा खात्याकडे दाखविण्यांत आले आहेत. गतवर्षी पुढील वर्षाच्या हिशेबासाठी म्हणून राखून ठेवलेला व इतर रक्कम मिळून हा आंकडा २.०४ कोटी रु. होता.

### भारतांतील जनरल विमा कंपन्यांची मालमत्ता

भारतीय जनरल विमा कंपन्यांची मालमत्ता ३१-१२-१९५७ रोजीं एकूण ४९.०२ कोटी रु. किंमतीची होती. १९५६ व ५५ चे हेच आंकडे अनुक्रमें ४३ व ४१.६५ कोटी रु. असे होते. यांपैकी १५.९ टक्के रक्कम हिंदी सरकारी रोख्यांत, ४.२ टक्के रक्कम परकीय सरकारांच्या रोख्यांत, २२.६ टक्के रक्कम भारतीय कंपन्यांच्या शेअर्स व डिबेंचर्समध्यें, १.७ टक्के रक्कम जमीन-जुमल्यांत, २८ टक्के ठेवींत, रोख रक्कम म्हणून व स्टॅम्पसाठीं, २.७ टक्के कर्जांत, ७.३ टक्के इतर मालमत्ता व बाकीची १७.६ टक्के रक्कम, एजंटाची देणें असलेली रक्कम. परदेशी कंपन्यांची मालमत्ता याच तारखेस ११.९१ कोटी रु. होती.

### व्यवसायाची वाढ

जनरल विमाव्यवसायांत वाढ होण्याचें प्रमाण या वर्षांत अधिक घटलें असल्याचें या अहवालांत म्हटलें आहे. या वर्षांतील वाढीचा निर्देशांक फक्त ०.७ टक्के आहे तर १९५६ चा ४.२ टक्के होता. या वर्षांत फायर, मरीन व संकीर्ण विमाव्यवसायापासून भारतीय कंपन्यांस हप्त्यांचें एकूण उत्पन्न १७.९३ कोटी रु. तर परदेशीय कंपन्यांस एकूण ९.८६ कोटी रु. झाले. या वर्षांत फायर विमाव्यवसायाचें एकूण उत्पन्न (ग्रॉस इन्कम) वगळतां विमा कंपन्यांच्या एकूण तसेंच निव्वळ हप्त्यांच्या उत्पन्नांत भारतीय विमा कंपन्यांच्या उत्पन्नाचें प्रमाण आणखी वाढलें आहे.

### व्यवस्थापकीय खर्च

भारतीय तसेंच परदेशी कंपन्यांच्या व्यवस्थापकीय खर्चासंबंधांत अहवालांत असें म्हटलें आहे कीं, या बाबतींत इन्शुअरन्स ॲक्टाच्या ४० सी कलमांतील तरतुदींचा भंग होण्याचें प्रमाण या वर्षी १९५६ पेक्षा वाढलें आहे. १९५६ मध्यें या तरतुदींचा भंग करणाऱ्या कंपन्यांपैकी ३ कंपन्यांस सदर कायद्याच्या ६४ एम (२) अनुसार इशारा देण्यांत आला होता.

### भारत व ज्युपिटर जनरल इन्शुअरन्स कंपन्यांचा कारभार

दि भारत इ. कं. लि. व ज्युपिटर जनरल इ. कं. लि. या दोन संयुक्त कंपन्यांच्या आयुर्विमा निधीचा कारभार या वर्षीहि सरकारी प्रशासकानेंच पाहिला. या दोन कंपन्यांचा सदर निधि ३१-१२-१९५७ रोजीं अनुक्रमें ८.२० कोटी व २.६७ कोटी रु. होता तर त्यांचे ३१-१२-१९५९ रोजीं चालू असलेलें एकूण काम अनुक्रमें २२.५० व ५.५८ कोटी रु. चें होतें.

### कंट्रोलर ऑफ इन्शुरन्सकडे आलेले तंटे

सन १९३८ च्या इन्शुरन्स ॲक्टाच्या ४७ ए कलमानुसार कंट्रोलर ऑफ इन्शुरन्स यांजकडे १९५८ मध्यें एकहि तंटा विचारार्थ आला नाहीं, तर ३१-१२-१९५८ पर्यंत आलेल्या एकूण २९६ तंट्यांपैकी फक्त ३ तंट्यांचा निकाल दिलेला नाहीं. भारतांत आयुर्विमा व्यवसायाचें राष्ट्रीयीकरण झाल्यामुळेंच १९५७-५८ मध्यें आपल्याकडे एकहि तंटा आला नाहीं असें कंट्रोलरनीं या अहवालांत म्हटलें आहे.

### विमा एजंट

सन १९५८ मध्यें परवाना मिळालेल्या विमा एजंटांची संख्या ६६,०५२ होती.

### वेळींच हिशेब सादर न करणाऱ्या कंपन्या

गेल्या सहा वर्षांत (१९५२ ते १९५७) २२ कंपन्यांनीं चार वा त्याहून अधिक वेळां, १४ कंपन्यांनीं ३ वेळां व १७ कंपन्यांनीं दोन वेळां आपले हिशेब वेळींच सादर न केल्याचें अहवालांत म्हटलें आहे. १९५७ मध्यें वेळींच हिशेब सादर न करणाऱ्या कंपन्यांची संख्या ४७ होती. १९५६ चा आंकडा ५८ होता.

## धरणयोजनांचे पाठोपाठ सुधार कर ( बेटरमेंट लेव्ही )

### कराचें समर्थन, प्रमाणाचे निकष व करभरणीची पद्धति

पाणीपुरवठ्याच्या एखाद्या योजनेमुळें, पाणीपुरवठा होणाऱ्या विभागांतील जनतेचा लाभ होतो इतकेंच नव्हे तर त्या विभागांचा झपाट्यानें आर्थिक विकास करणारी परिस्थितीहि निर्माण होते. परिणामीं पाणीपुरवठ्याची सोय झालेल्या व त्याजवळच्या जमिनींच्या किंमती वाढतात आणि या किंमती वाढण्यासाठी जमीनमालकांनीं कोठल्याहि प्रकारें परिश्रम घेतलेले नसतात.

याप्रमाणें, शेतकऱ्यानें स्वतः पैसे खर्च व करतां अथवा अधिक श्रमशक्ति व लावतां वाढलेल्या जमिनींच्या किंमतीचा एक भाग म्हणजे सुधार कर ( बेटरमेंट लेव्ही ) असें म्हणतां येईल. शेतकऱ्यास जादा खर्च वा श्रमशक्ति न लावतां झालेल्या लाभावरील हा कर असून त्यानें अधिक चांगलीं बियाणीं, अधिक खत व शेतीच्या सुधारलेल्या पद्धतींचा अवलंब करून मिळविलेल्या नफ्यावरील कोठलाहि भाग, हा कर हिरावून घेत नाहीं आणि म्हणून या कराची आकारणी शेतकऱ्याच्या जादा उत्पादनावर नव्हे तर जमिनींच्या वाढलेल्या किंमतीवर होते. तसेंच हा कर बहुधा १० ते २० वर्षांत वसूल करण्यांत येतो आणि तो शेतकऱ्यानें आपल्या आर्थिक परिस्थितीनुसार छोट्या छोट्या वार्षिक हप्त्यांनीं यावयाचा असतो. राष्ट्रीय प्रगतीचा विचार करतां देखील सरकारनें एखाद्या योजनेसाठी गुंतविलेल्या पैशावरील लाभांश पुढील विकासाकरितां उपलब्ध होणें आवश्यक आहे.

### कायदेशीर मंजुरी

अनेक राज्यांनीं सुधार कर आकारण्यासाठी यापूर्वींच कायदे केले आहेत. इ. स. १८८८ मध्यें जुन्या म्हैसूर संस्थानांत पाणीपुरवठा योजनासंबंधांत 'कॉन्ट्रीब्यूशन' या नांवें ओळखला जाणारा सुधार कर प्रथमतः लादला गेला आणि आजहि तेथें हा कर आकारण्यांत येतो.

अलीकडील काळाचा विचार करतां आंध्र प्रदेश, आसाम, मुंबई, केरळ, मध्य प्रदेश, मद्रास, म्हैसूर, पंजाब, राजस्थान, या राज्यांनीं व हिमाचल प्रदेश या केंद्रशासित प्रदेशानें सुधार करविषयक कायदे संमत केले आहेत. त्याचप्रमाणें बिहार सरकारहि असा कायदा करण्यासाठी उपाय योजीत आहे. जम्मू व काश्मीर, उत्तर प्रदेश व प. बंगाल राज्य सरकारेंहि व केंद्रशासित दिल्ली राज्यहि असा कायदा करण्यासंबंधीं विचार करीत आहे. इतर केंद्रशासित प्रदेशांत धरणयोजना नसल्यानें तेथें सुधार कर लादण्याचा प्रश्न उद्भवत नाहीं.

### कराचें प्रमाण ठरविण्याचे विविध निकष

या कराचें प्रमाण ठरवितांना अनेक निकषांचा विचार करावा लागतो. हे निकष पुढीलप्रमाणें होत :—

( १ ) योजना सुरू झाल्याच्या दिनांकापासून तों ती पुरी होईपर्यंतच्या मुदतींत तिचा लाभ मिळणाऱ्या जमिनीच्या बाजारभावांत होणारी वाढ.

( २ ) योजना पुरी झाल्यानंतर त्या विभागांतील वा सभोंवतालच्या टापूंतील पाणीपुरवठा होणाऱ्या जमिनींच्या व पाणीपुरवठा न होणाऱ्या किंवा कोरडवाहू जमिनींच्या बाजारभावांतील तफावत. योजना विभागांतील किंवा त्या भोंवतालच्या टापूंतील पाण्याखालील आणि पाणी न मिळणाऱ्या जमिनींच्या बाजारभावांत हा कर आकारण्यास प्रारंभ करतांच पडणाऱ्या फरकाची ही तुलना होय.

( ३ ) एका वर्षांत अशा जमिनींतून मिळणाऱ्या शेतकी मालाच्या किंमतींत झालेल्या वाढीच्या पटींत वाढलेली जमिनींची किंमत.

( ४ ) प्रमुख पिकांच्या उत्पादनांतील वाढ.

( ५ ) सदर योजनेच्या भांडवली खर्चाच्या कांहीं भागाची वसुली.

( ६ ) पाटबंधाऱ्याचा प्रकार व पाणीपुरवठ्याची पद्धति.

याशिवाय जमिनीचा कस, कोरडवाहू जमिनीचें ओल्या जमिनींत रूपांतर करण्यासाठी झालेला खर्च, यासारख्या इतर बाबींहि विचारांत घ्याव्या लागतात. ही वसुली म्हणजे शेतकऱ्यांना मिळणाऱ्या जादा नफ्यांतील केवळ अंशभाग होय.

### कर भरण्याची रीत

सुधार कराचें प्रमाण ज्याप्रमाणें वेगवेगळें असतें त्याचप्रमाणें निरनिराळ्या राज्यांत तो देण्याची पद्धतीहि वेगवेगळी ठरवून दिलेली आहे. सर्वसामान्यतः हा कर अनेक हप्त्यांनीं यावयाचा असतो. देशाच्या निरनिराळ्या प्रदेशांत १५ ते २० हप्त्यांत रोख रकमेंत किंवा तितक्याच किंमतीची जमीन देऊन तो भरला जातो. पंजाब राज्यांत हा कर ३० हप्त्यांत घेतला जातो तर इतर कांहीं राज्यांत तो किती हप्त्यांत यावा तें ठरविलेलें नाहीं.

या कराच्या आकारणीचा दिनांकहि वेगवेगळा असतो. आंध्र प्रदेशांत काम पुरें झाल्यापासून तीन वर्षें संपेपर्यंत तो घेण्यांत येत नाहीं. तेलंगण विभागांत महसुली सवलतीची मुदत संपल्यानंतर या कर आकारणीस प्रारंभ होतो. ही मुदत काम पुरें झाल्यानंतर तीन वर्षांपेक्षा कमी नसते. केरळ राज्यांत पाणीपुरवठ्याची तरतूद केल्याच्या दिनांकानंतर दोन वर्षांनीं हा कर भरावयाचा असतो. ओरिसा, हिमाचल प्रदेश व बिहार या राज्यांतहि कर आकारणीची मुदत अशी वेगवेगळी असते.

---

### रेडिओवरील जाहिराती

अर्थखात्याचे उपमंत्रि, श्री. भगत, ह्यांनीं लोकसभेंत सांगितलें कीं, आतां सिलोन रेडिओवर जाहिरात करण्यासाठी हिंदी कारखानदारांना मर्यादित प्रमाणावरच परदेशी चलन उपलब्ध करून देण्यांत येतें. परदेशांतील प्रचारामुळें निर्गत किती वाढूं शकेल हें विचारांत घेऊन त्याबाबत निर्णय केला जातो. १९५६ मध्यें अशा जाहिरातीसाठी ३३ लक्ष रुपयांची हुंडणावळ उपलब्ध करून देण्यांत आली होती; चालू वर्षाच्या पहिल्या सहामाहींतील तत्सम रक्कम फक्त २,३२,८८० रु. आहे. हिंदी नभोवाणीवर जाहिरातीसाठी वेळ विकण्यास सरकारची तयारी नाहीं. परंतु, रेडिओवरील जाहिरातीमुळें हिंदी मालाच्या निर्गतीस मदत होते, हें सरकारला जर मान्य आहे, तर इतर देशांसाठी केल्या जाणाऱ्या ध्वनिक्षेपनांत जाहिरातींना वेळ देण्यास हरकत असूं नये. त्यामुळें निर्गतीस चालना मिळेल, परदेशी हुंडणावळ प्राप्त होईल, आणि हिंदी नभोवाणीला जाहिरातींचें उत्पन्न मिळेल.

---

### बंद पडलेल्या गिरण्या

१९५७ व १९५८ मध्यें मुंबई राज्यांतील २६ कापडगिरण्या बंद पडून ३६,७१२ कामगार बेकार झाले. त्यांपैकी १४ गिरण्या पुनः सुरू होऊन १८,०५१ कामगारांना पुनः काम मिळालें.

## भारतांतील वृत्तपत्रांच्या संख्येंत व खपांत वाढ

### प्रेस रजिस्ट्रारांचा तिसरा अहवाल

भारतांत १९५८ मध्यें वृत्तपत्रांचा खप १९५७ मधील खपाशीं तुलना करतां ८·८ टक्क्यांनीं वाढल्याचें भारताचे प्रेस रजिस्ट्रार यांच्या १९५८ च्या वार्षिक अहवालावरून दिसून येतें.

ही तुलना १९५७ व १९५८ या दोन्हीं वर्षांची माहिती मिळालेल्या २,५७४ पत्रांच्या खपावर आधारलेली आहे.

सन १९५८ मध्यें ३,९११ पत्रांची माहिती हातीं आलेली असून त्यांचा खप १४४·३७ लक्ष होता. १९५७ मध्यें ३,७६१ पत्रांच्या खपाबाबतची माहिती मिळालेली होती व त्यांचा एकूण खप १२९·६२ लक्ष होता.

तसेंच, देशांत प्रकाशित होणाऱ्या पत्रांच्या संख्येंतहि वाढ दिसून आली आहे. १९५७ मध्यें प्रेस रजिस्ट्रारांच्या दप्तरांत ५,९३२ पत्रांची नोंद होती तर १९५८ मध्यें ही संख्या वाढून ६,९१८ झाली. त्यांपैकी १,०६२ पत्रें १९५८ मध्यें सुरू झालेलीं आहेत.

### मराठी पत्रांच्या खपांत १४·१ टक्क्यांनीं वाढ

वृत्तपत्रांच्या खपांत झालेली वाढ निरनिराळ्या भाषांत वेग-वेगळ्या प्रमाणांत झालेली आहे असें या अहवालांत म्हटलें आहे. हिंदी पत्रांचा खप १३·२ टक्क्यांनीं, तर इंग्रजी पत्रांचा ७·९ टक्क्यांनीं व मराठी पत्रांचा खप १४·१ टक्क्यांनीं वाढला. इतर भाषांच्या बाबतींत पाहतां ही वाढ, आसामी १०·३, बंगाली ०·९, गुजराती १३·४, कन्नड ४·३, मल्याळम ९·६, ओरिया १·२, पंजाबी ९·८, तामिळ २·१, तेलगू २·१ व उर्दू १६·२ टक्के याप्रमाणें झाली.

जुलै तें डिसेंबर १९५६ या मुदतीचा पहिला अहवाल सादर केल्यानंतर प्रकाशकांकडून माहिती मिळण्याच्या बाबतींत हळूहळू सुधारणा होत असल्याचें प्रेस रजिस्ट्रारांनीं आपल्या या अहवालांत म्हटलें आहे. १९५८ मध्यें ४,१९९ पत्रांकडून वार्षिक पत्रकें मिळालीं. १९५७ मधील हाच आंकडा ३,०५९ होता. मात्र १९५७ चा अहवाल सादर केल्यानंतर आणखी १,०५८ पत्रां-कडून माहिती मिळाली.

### मासिकांचा खप

सदर अहवालांत खपाबाबत मिळालेल्या माहितीचे भाषा व प्रकाशन काल यानुसार विश्लेषण करण्यांत आलेलें आहे. १९५८ मध्यें दैनिक पत्रांचा खप ३६·०६ लक्ष होता. १९५७ मध्यें तो ३४·६६ लक्ष होता. सर्वांत जास्त म्हणजे ४६·२४ लक्ष खप होता तो मासिकांचा. १९५७ मध्यें त्यांचा खप ४०·४६ लक्ष होता. साप्ताहिकांचा खप १९५७ मध्यें ३७·४७ लक्ष होता तो वाढून १९५८ मध्यें ३८·६९ लक्ष प्रति झाला. पाक्षिकांचे हेच आंकडे अनुक्रमें ९·९१ लक्ष व १२·१९ लक्ष असे होते. इतर नियतकालिकांचा खपहि १९५७ मधील १०·१२ लक्षांवरून १९५८ मध्यें वाढून ११·१९ लक्षांवर गेला.

### सर्वांत जास्त खप इंग्रजी पत्रांचा

सर्वांत जास्त म्हणजे ३३·७७ लक्ष खप इंग्रजी पत्रांचा होता. म्हणजे हें प्रमाण एकूण खपाच्या २३·४ टक्के पडलें. त्याखालो-खाल हिंदीचा क्रम लागतो. हिंदी पत्रांचा खप २७·१७ लक्ष किंवा १८·८ टक्के होता. इतर भाषिक पत्रांच्या खपांचे आंकडे पुढीलप्रमाणें आहेत:—मराठी १०·५५ लक्ष (७·३ टक्के), तामिळ १९·२८ लक्ष (१३·४ टक्के), गुजराती १०·३१ लक्ष (७·१ टक्के), उर्दू ८·३७ लक्ष (५·८ टक्के), बंगाली ७·४१ लक्ष (५·१ टक्के), मल्याळम ६·९८ लक्ष (४·८ टक्के), व तेलगू ६·०५ लक्ष (४·२ टक्के).

तीनशेंएकवीस दैनिक पत्रांच्या एकूण ३६·०६ लक्ष खपापैकी ९·८६ लक्ष किंवा एकूणाच्या एक चतुर्थांशाहून किंचित् जास्त खप ५२ इंग्रजी दैनिकांचा होता. त्याखालोखाल म्हणजे ५·४५ लक्ष खप ७३ हिंदी दैनिकांचा मिळून असून त्यानंतर ३·४९ लक्ष खप ३४ मराठी दैनिकांचा होता. तसेंच २१ मल्याळम दैनिकांचा ३·०४ लक्ष, २८ गुजराथी दैनिकांचा २·६९ लक्ष, १७ तामिळ दैनिकांचा २·६९ लक्ष, ४४ उर्दू दैनिकांचा १·९९ लक्ष, ५ बंगाली दैनिकांचा १·९२ लक्ष, व १० कन्नड दैनिकांचा १·११ लक्ष याप्रमाणें खप होता; तर तेलगू, ओरिया, पंजाबी व आसामी दैनिकांचा खप प्रत्येकीं एक लक्षांपेक्षाहि कमी होता. द्वैभाषिक दैनिकांचा एकूण खप १·२८ लक्ष होता. प्रेस रजि-स्ट्रारांकडे माहिती आलेल्या १२ द्वैभाषिक दैनिकांपैकी ८ इंग्रजी–मल्याळम होती परंतु प्रत्यक्षांत ती मल्याळमच होती. एकूण १·२८ लक्ष खपापैकी त्यांचा खप १·२६ लक्ष होता. ही संख्या मल्याळम दैनिकांच्या खपाच्या संख्येंत धरल्यास, मग त्या भाषेंतील २९ दैनिकांचा एकूण खप ४·३० लक्ष होईल व इंग्रजी आणि हिंदी खालोखाल त्यांचा क्रम लागेल.

### प्रमुख पत्रें

या अहवालांत ५०,००० वर आणि २०,००० ते ५०,००० या दरम्यान खप असलेल्या दैनिकांची व नियतकालिकांची यादी दिलेली आहे. १९५८ मध्यें ५० हजारांवर खप असलेलीं १६ दैनिकें व २० नियतकालिकें होतीं. १९५७ मधील हेच आंकडे अनुक्रमें १५ दैनिकें व १६ नियतकालिकें असे होते. या १६ दैनिकांपैकी दोन इंग्रजी व एक तामिळ पत्राचा खप प्रत्येकी एक लक्षाहून जास्त होता. नियतकालिकांपैकी पांचांचा खप प्रत्येकी एक लक्षावर होता. त्यांपैकी एक पत्र इंग्रजी दैनिकाची साप्ताहिक आवृत्ति असून दोन तामिळमधील साहित्यिक व सांस्कृतिक विषयांचीं नियतकालिकें आहेत. याशिवाय एक चित्रपटविषयक इंग्रजी नियतकालिक व एक धर्म व तत्त्वज्ञान-विषयक हिंदी मासिक आहे. १९५७ मध्यें एक लक्षावर खप असलेलीं नियतकालिकें अवघीं तीन होतीं. त्यांपैकी एक इंग्रजी दैनिकाची साप्ताहिक आवृत्ति, एक हिंदी मासिक व एक तामिळ द्वैमासिक होतें.

---

**साखरेवरील नियंत्रणें काढा**—दिल्ली येथें साखर व्यापाऱ्यांच्या प्रतिनिधींची एक सभा भरविण्यांत येऊन अखिल भारतीय साखर व्यापारी संघ स्थापन करण्यांत आला. देशांत साखरेची टंचाई नसल्यामुळें सरकारनें साखरेच्या वांटपावरील व किंमतीवरील नियंत्रणें रद्द करावीं, अशी मागणी करणारा ठराव मंजूर करण्यांत आला.

**राजस्थानांतील खनिजांचा विकास**—राजस्थानांत तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत शिसें, तांबें, सोडा अॅश व खतें तयार करण्याचे कारखाने काढण्यांत येण्याची शक्यता आहे. ह्या व इतर कारखान्यांसाठी लागणारा विजेचा पुरवठा अणुशक्तीच्या साह्यानें करण्यांत येण्याचाहि संभव आहे. राज-स्थानांत कोळसा सांपडत नाहीं.

## अर्बन बँकांनीं आपली परिस्थिति तादून पाहावी

"भारतामध्यें को-ऑपरेटिव्ह बँकिंग करणाऱ्या ज्या बिगर-शेतकी सोसायटया आहेत व ह्यासंबंधींचा जो अहवाल गेल्या जुलै महिन्यांत प्रसिद्ध झाला आहे त्याची थोडी आंकडेवार माहिती आपल्यापुढें मी मांडूं इच्छितों. त्यामुळें सबंध भारतांतील या सहकारी विभागाचें सम्यक् दर्शन आपणांस मिळेल व त्याचेशीं आपल्या बँकेच्या व्यवहारांची तुलनात्मक छाननी करतां येईल. को-ऑपरेटिव्ह बँकिंग ज्या बिगर-शेतकी सोसायटया करतात त्यामध्यें अर्बन को-ऑपरेटिव्ह बँका, सेवकवर्गाच्या क्रेडिट सोसायटया इतर विशिष्ट प्रकारच्या स्वरूपाच्या सोसायटया या सर्वांचा एकत्रपणें समावेश करून हा अहवाल प्रसिद्ध केलेला आहे. हा अहवाल १९५७-५८ चा आहे. भारतामध्यें अशा सोसायटयांची संख्या १०,१५० वरून १०,४३० पर्यंत वाढली आहे. यापैकीं ४० टक्के सोसायटया मुंबई व पंजाब राज्यामध्येंच आहेत. समासदांची संख्या ३६॥ लाखांवरून ४० लाखांवर वाढली आहे व त्या सर्व सोसायटयांचे फंड ३० कोटींवरून ३४॥ कोटींपर्यंत वाढले आहेत. सेंळतें भांडवल १००॥ (साडेशंभर) कोटींवरून १०२॥ कोटींवर गेलें आहे व या सेळतें भांडवलापैकी एकटया मुंबई राज्यामधील अशा प्रकारच्या सोसायटयांचें सेळतें भांडवल ३७ कोटींचें आहे. एकूण कर्जे ८७ कोटी दिलें गेलें. त्यापैकीं नुसतें मुंबई राज्यांतच ३७ कोटी दिलें गेलें. कर्जे थकबाकी एकूण ७९ कोटी आहे व त्यापैकी दिलेली मुदत संपून गेली तरी वसूल न झालेलें कर्जांचें शेंकडा प्रमाण ८.०३ टक्के असें आहे. त्या अहवालांत ठेवींचें प्रमाण ६४ कोटींवरून ६० कोटींपर्यंत खाली आलें आहे, असें म्हटलें आहे."

(जनता सहकारी बँकेचे चेअरमन, श्री. गो. प्र. भागवत, ह्यांच्या भाषणांतील उतारा.)

## अमेरिकन कंपन्यांच्या अध्यक्षांचें वेतन

वेतनाच्या अनुक्रमानें खालील तक्त्यांत माहिती देण्यांत आली आहे. सर्वांत जास्त तनखा बेथलहेम. कॉर्पोरेशनच्या अध्यक्षांना मिळतो. त्याची वार्षिक रक्कम २,२३,००० डॉलर म्हणजे दरमहा ९०,००० रु. होते. अमेरिकन कंपन्यांचे अध्यक्ष कंपनीचा प्रत्यक्ष कारभार पहाणारे असतात; आपल्या इकडील डायरेक्टर बोर्डाच्या चेअरमनसारखे नसतात.

| कंपनी | वार्षिक वेतन (डॉलर किंवा रुपये) | मासिक वेतन (रुपये) |
|---|---|---|
| जनरल मोटर्स | १९९,००० (रु.९४७,२४०) | ७८,९३७ |
| क्राइसलर | १६०,००० (रु.७६१,६००) | ६३,४६७ |
| पब्लिक स्टील कॉर्पो. | १३५,००० (रु.६४२,६००) | ५३,५५० |
| फोर्ड मोटर्स | १३२,००० (रु.६२८,३२०) | ५२,३६० |
| युनायटेड मर्चंटस् मॅ. | १३२,००० (रु.६२८,३२०) | ५२,३६० |
| डिस्टिलर्स कॉर्पोरेशन | १२८,००० (रु.६०९,२८०) | ५०,७७३ |
| कोलंबिया ब्रॉडकास्टिंग | १२०,००० (रु.५७१,२००) | ४७,६०० |
| ई. आय. ड्यू पाँट | ११५,००० (रु.५४७,४००) | ४५,६१७ |
| नॅशनल स्टील कॉर्पो. | ११४,००० (रु.५४२,६४०) | ४५,२२० |
| गल्फ ऑइल कॉर्पो. | ११३,००० (रु.५३७,८८०) | ४४,८२३ |
| कोलगेट अँड पामोलिव्ह | १०७,००० (रु.५०९,३२०) | ४२,४४३ |

## इराकशीं व्यापार वाढविण्याची शक्यता

इंडो-अरब-सोसायटी ह्या संस्थेपुढें भाषण करतांना मुंबईचे एक बडे व्यापारी मि. हशम प्रेमजी ह्यांनीं भारत व इराक ह्यांच्यामधील व्यापार वाढविण्याचा सल्ला दिला. भारत सरकारनें आपलें एक प्रतिनिधि मंडळ इराकमध्यें पाठविलें होतें. त्या प्रतिनिधि-मंडळाचे नेते म्हणून मि. प्रेमजी तिकडे गेले होते. ह्या विषयासंबंधीं बोलतांना ते म्हणाले कीं, इराकमधील सध्यांची परिस्थिति त्या देशाकडे करण्यांत येणारी निर्यात वाढविण्यास फार अनुकूल आहे. उभयता देशांमधील व्यापाराची वृद्धि करण्यांत आली तर तें दोन्ही देशांना फायदेशीर होईल ह्याची जाणीव इराकमध्यें आहे. इराक दरसाल साधारणपणें ८० लाख पौंड चहा आयात करतो. त्यापैकीं ९ ते १२ टक्के चहा भारताकडून आयात केला जातो. पण वाहतुकीची व्यवस्था व विम्याची अधिक चांगली सोय करण्यांत आली तर भारताला आपली चहाची निर्यात अधिक वाढवितां येईल. इराकचा बहुतेक आयात व्यापार त्या देशाच्या सरकारच्या हातीं आहे. इराकचें सरकार भारताला अनुकूल आहे. त्यामुळें शेतीचीं अवजारें, चांगल्या प्रतीचें कापड, एंजिनिअरिंगचा हलक्या वजनाचा माल, इत्यादि माल भारत इराकला निर्यात करूं शकेल. ह्या मालाला तेथें चांगली बाजारपेठहि मिळूं शकेल. इराकमध्यें सध्यां रेल्वेच्या रस्त्यांचा विस्तार करण्यांत येत आहे. त्याशिवाय चालू मार्गांची सुधारणाहि करण्यांत येत आहे. ह्या संधीचा फायदा घेऊन भारत इराकला रेल्वेला लागणारा विविध प्रकारचा माल पुरवू शकेल. इराकसारख्या ज्या देशांना भारत माल पुरवूं शकेल त्या देशांच्या गरजांचा अभ्यास करण्यांत आला पाहिजे. म्हणजे निर्यात वाढविण्यास मदत होईल.

## पोस्टमनचें कंबरडें मोडणारी बँक

बांधकामाच्या विटा पोस्टानें मागविल्याचें कुणीं ऐकलें आहे का? अमेरिकेंतील उटा ह्या संघराज्यांतील व्हर्नाल ह्या गांवीं बँकेची इमारत बांधण्यासाठी ५०,००० विटा लागल्या. त्या सर्व पोस्टानें मागविण्यांत आल्या! १९१६ सालीं बँकेच्या डायरेक्टरांनीं, आगीस दाद न देणारी इमारत बांधण्याचें ठरविलें. विटा भाजणाच्या भट्टया सॉल्ट लेक सिटी येथें होत्या, पण तेथून व्हर्नालला येणारा रस्ता खराब होता. लॉरीवाल्यांनीं प्रत्येक हंड्रेडवेट वजनास ३ डॉलर एवढी रक्कम मागितली. म्हणजे, लॉरीनें आणलेल्या प्रत्येक विटेला १५ सेंट भाडेंच पडलें असतें; आणि एकूण भाडें ७,५०० डॉलर झालें असतें. ह्या विटा लॉरीनें आणण्यापेक्षा पोस्टानें मागविल्या तर निम्म्या पैशांत येऊन पडतील, अशी बँकेच्या एका नोकरानें (पुढें तो बँकेचा अध्यक्ष झाला) शक्कल काढली. पोस्टाच्या पार्सलचें कमाल वजन ५० पौंडांपेक्षा जास्त असतां कामा नये, असा नियम होता. तेव्हां दहा दहा विटांचें एक एक पार्सल, अशीं ५,००० पार्सलें मागविण्यांत आलीं. ह्या पार्सलांचा बटवडा अर्थातच वेळेवर होऊं शकला नाहीं; पोस्टांत पार्सलांचा ढीग पडूं लागला; तेव्हां पोस्टल इन्स्पेक्टरानें चौकशी करून रिपोर्ट केला. पोस्ट खात्यानें नवा नियम करून कोणालाहि एकाला, एका दिवशीं २०० पौंडांपेक्षा जास्त वजनाचीं पार्सलें एकाच पत्त्यावर पाठवतां येणार नाहींत असें ठरविलें. बँकेनें त्यावरहि तोड काढली; स्थानिक शेतकरी व बँकेचे हितचिंतक ह्यांच्या नांवानें विटांचीं पार्सलें मागविलीं! हीं सर्व पार्सलें येण्यास कित्येक महिने लागले, पण अखेर व्हर्नाल गांवाच्या बँकेला फायर-प्रुफ इमारत लाभली.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व
श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.